**महाराष्ट्र शासन**
**सहसंचालक,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, छत्रपती संभाजीनगर**
शासकीय तंत्रनिकेतन जवळ, पत्रपेटी क्र.५१६, उस्मानपुरा,छत्रपती संभाजीनगर-४३१ ००५
दुरध्वनी क्र.: (०२४०)२३३४२१६/२३३४७६९
http://www.dteau.org
Email ID- roaurangabad@dtemaharashtra.gov.in

जाक्र/विकाछसं/शिक्षण/२०२३/ 3667 दिनांक :- **18 OCT 2023**

प्रति,
प्राचार्य,
सर्व शासकिय,अनुदानित, विनाअनुदानित
पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्था

**विषय :- दिनांक १९.१०.२०२३ रोजी दुपारी ४.०० वाजता मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांचे हस्ते उद्घाटन होणा-या प्रमोद महाजन ग्रामीण कौशल्य विकास केंद्रांच्या उद्घाटन सोहळ्यात सहभागी होणेबाबत...**

संदर्भ :- मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र. २/एनजीपी/कौशल्य विकास केंद्र/२०२३/९२९, दि. १८.१०.२०२३.

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, राज्य शासनामार्फत राबविण्यात येणारी प्रमोद महाजन ग्रामीण कौशल्य विकास केंद्र ही संकल्पना राज्यातील तरुणांच्या रोजगार संधीसाठी आणि ग्रामीण भागाच्या विकासाला चालना देणारी असून ग्रामीण भागातील तरुणांच्या रोजगार संधी आणि त्यांना स्वावलंबी करण्याला प्राधान्य देण्यासाठी सदर योजना करण्यात आलेली आहे.

राज्यातील एकूण ५११ प्रमोद महाजन ग्रामीण कौशल्य विकास केंद्रांचे उद्घाटन भारताचे माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या हस्ते गुरुवार १९ ऑक्टोबर २०२३ रोजी दुपारी ४ वाजता ऑनलाईन पद्धतीने होणार आहे. तरुणांच्या रोजगार संधी आणि ग्रामीण भागाच्या विकासाला चालना देणारे हे महत्वाचे पाऊल आहे. त्यामुळे या केंद्रांची माहिती या उद्घाटन सोहळ्याच्या माध्यमातून व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचणार आहे. सदर सोहळा **दि. १९.१०.२०२३ रोजी दुपारी ठीक ४.०० वाजता** सुरू होणार असून तो https://www.youtube.com/live/lBsVAE13nL8?si=PaPX4nqron9aFI4R या लिंकवर उपलब्ध आहे.

तरी उपरोक्त सोहळयास आपल्या संस्थेतील विद्यार्थ्यांना सहभागी होण्याबाबत कळविण्यात यावे.

**(उमेश नागदेवे)**
प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, छत्रपती संभाजीनगर